नियमित दिवाणी दावा नं. २२२/२०१५
शोभाबाई वि. गजानन व ईतर
**निशाणी क्र.६३ खाली**
C.N.R No. MHWS020006302015

**<u>वादी नं.१ याचा सरतपास अधिवक्ता श्री. आर. जी. चंदनाणी यांचे तर्फे शपथेवर सुरु</u>**

मी, सदर प्रकरणात माझा शपथेवरील पुरावा दाखल केला असुन त्यातील मजकुर माझ्या माहिती प्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. ते मला मान्य आहे.

प्रतिवादी क्रं १ यांचे विधीज्ञ यांनी निशानी क्रं. ४ लगत अनुक्रम एक वर असलेल्या फेरफार नंबर १७ ची साक्षांकित प्रत आणि उप विभागीय अधिकारी यांचा आदेश दिनांक ०४/०६/२०१५ चा आदेश मान्य केल्याने त्यास **<u>निशानी क्रं ६४ व ६५</u>** देण्यात आले

सरतपास पुर्ण

**निशानी ३५ च्या आदेशान्वये साक्षीदाराचा उलटतपास प्रथम प्रतिवादी क्रं २ यांना घेण्याचा आदेश झालेला आहे सबब**

**<u>वादीचा उलटतपास प्रतिवादी २ चे अधिवक्ता श्री. सी. एस. पोद्दार यांचे मार्फत फेरशपथेवर सुरु.</u>**

माझें वडीलांचे नाव माधव कृष्णाजी बोबडे आहे. माझे वडीलांना तीन भाउ त्यांचे नाव नामदेव, तुकाराम आणि शिवराम आहे. मला पाच आत्या आहे त्यांचे नाव दुर्गाबाई, पार्वताबाई, सुभीद्राबाई, शांतुबाई आणि अनुसयाबाई आहे. सुभीद्राबाई म्हणजेच सुभद्राबाई. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडील, सर्व काका आणि सर्व आत्यांचे एकत्र कुटुंब होते आणि कारभारी कर्ता हे नामदेव होते. हे म्हणणे खरे आहे की, आमचे एकत्र कुटुंबाकडे एकुण २० ते २५ एकर जमीन होती आणि ती आजोंबाचीं वडीलोपार्जित होती. माझे आजोबा कृष्णाजी वारल्यानंतर सर्व जमीनी माझे वडील, सर्व काका व सर्व आत्यांच्या ताब्यात होती. हे म्हणणे खरे आहे की, माझे आजोबा यांचा व्यवसाय फक्त शेतीचा होता. हे म्हणणे खरे नाही की, सर्व्हे नं. ८/२ मधील ३ एकर २३ गुंठे जमीन माझ्या वडीलांनी एकत्र

कुटुबांच्या उत्पन्नातुन खरेदी केलेली आहे. माइया म्हणण्याप्रमाणे माझे आजोबांनी ती जमीन विकत घेतलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या वडीलोपार्जित जमीनीमध्ये सर्व आत्यांनी त्यांचा हक्क सोडुन दिला आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी दावा दोन शेताबाबत दाखल केलेला आहे. एक ३४ गुंठे व एक १७ गुंठे क्षेत्र आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे असे म्हणणे आहे की या जमीन वडीलोपार्जित असल्याकारणाने त्यात माझा १/४ हिस्सा आहे. हे म्हणणे खरे नाही की, ३४ गुठांच्या पुर्वेकडे ३१ गुठयांची जमीन असुन ती जमीन माझे वडीलांनी सावकारीच्या व्यवहारापोटी अटक म्हणुन खरेदी करुन दिली होती. साक्षीदार पुन्हा सांगतो की माइया वाडीलांनी वर नमुद केलेली ३१ गुठे जमीन सावकारीच्या व्यवहारा पोटी अटक म्हणुन खरेदी करुन दिलेली होती. हे म्हणणे खरे आहे की, नंतर प्रतिवादी क्रं १ व २ यांनी ती ३१ गुठे जमीन सोडुन घेतली. अणि खरेदीखत हे प्रतिवादी क्रं १ व २ यांनी मिळुन गजाननच्या नावाने घेतली. हे म्हणणे खरे आहे की, या ३१ गुंठे जमीनीच्या पुर्वेला रणसिंगे यांची जमीन आहे. हे म्हणणे खरे आहे की, ३४ गुंठे जमीनीच्या पश्चिमेकडील १ एकर जमीन रेखा देवराव बोबडे याला विकली. हे म्हणणे खरे आहे की, या १ एकर जमीनीच्या पश्चिमेला लागुन आणखी १ एकर जमीन माझे वडीलांनी प्रतिवादी क्रं १ च्या पत्नीच्या नावे विकली. अणि त्या शेताच्या पश्चिमेला लागुन वाघ यांची शेती आहे. हे म्हणणे खरे आहे की, ३४ गुंठे जमीनीच्या उत्तरेकडुन पांदन रस्ता आहे.

**न्यायालयीन वेळ संपल्यामुळे उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by NAYOMI PRAKASH PAWAR
Date: 2022.11.08 17:49:48 +0530

(नयोमी. पी. पवार)

दिनांक — ०८.११.२०२२

सह दिवाणी न्यायाधीश (व. स्तर),
वाशिम.

नियमित दिवाणी दावा नं. २२२/२०१५
शोभाबाई वि. गजानन व ईतर
**निशाणी क्र.६३ खाली**
C.N.R No. MHWS020006302015

**Certificate**

I affirm that the contents of this P.D.F file are same word to word, as per the original Evidence.

| | | |
|---|---|---|
| Court Name | : | Jt. Civil Judge (S.D.), Washim, Dist.Washim. |
| Date | : | 08.11.2022. |
| Evidence signed by the presiding officer on | : | 08.11.2022. |
| Evidence uploaded on | : | 08.11.2022. |
| Evidence uploaded by | : | P.K. Gour (Jt. Clerk.) |